नियमित फौजदारी खटला क्र.१६५/२०२२
निशाणी क्र.३५

सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ चा सरतपासः-
मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - पो. कॉ./३ शाम बाबासाहेब गुंजाळ,
वय - ३० वर्षे, धंदा - नोकरी,
नेमणूक - शेवगाव, पोलीस स्टेशन.

अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.के.सोनवणे यांचे मार्फत सुरुः-

दिनांक १६/०७/२०२१ रोजी मी नेवासा पोलिस स्टेशनला पोलिस शिपाई म्हणून कार्यरत होतो. सदर दिवशी माझी रायटर म्हणून डयुटी होती. त्यावेळी पोलिस स्टेशनला तलाठी राहूल साठे यांचा फोन आला व त्यांनी फोनवर सांगितले की, एक वाळूने भरलेला ट्रॅक्टर पकडलेला आहे, पोलिस मदत पाठवा. त्यानंतर पो.नि. क-हे साहेब यांनी मला व पो.कॉ इथापे यांना तिथे जाण्यास सागिंतले. त्यानंतर मी व पो.कॉ. इथापे महादेव मंदीर, घोगरगाव येथे गेलो. तिथे आप्पासाहेब कोकणे त्यांना ट्रॅक्टर पोलिस स्टेशनला घेण्यास सांगितला. त्यानंतर मी, पो.कॉ. इथापे व तलाठी साठे आरोपी व ट्रॅक्टर घेवुन पोलिस स्टेशनला आलो. लाल व भगव्या कलरचा ट्रॅक्टर होता. ट्रॅक्टर मध्ये अर्धा ब्रास वाळु होती. तिथे तलाठी भाऊसाहेब यांनी गुन्हा दाखल केला. आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर नाही.

सरतपास पुर्ण

उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ के.बी. शिंदे यांचेमार्फत सुरु-

२. हे म्हणणे खरे आहे की, घोगरगाव ते टाकळीभान या गावाच्यामध्ये शिव रस्ता आहे. सदर शिव रस्त्याच्या पश्चिमेस आरोपीची शेती आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाळू भरतांना मी स्वत: ट्रॅक्टर पाहिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, ट्रॅक्टर आरोपीच्या शेतात उभा होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर ट्रॅक्टर मी स्वत: चालवत आणला. सदरचा ट्रॅक्टर पोलिस स्टेशनला तलाठी भाऊसाहेबांनी जमा केला. घोगरगावला जाताना मी स्टेशन डायरीला नोंद केली नव्हती. मी घोगरगावला खाजगी वाहनाने गेलो होतो. आम्ही ६:०० ते ६.१५ वाजेच्या दरम्यान पोलिस स्टेशनला आलो. त्यानंतर लगेच तलाठी भाऊसाहेब यांनी गुन्हा दाखल केला. गुन्हा १८ तारखेला नोंदवला. वाळूचे मोजमाप केलेले नाही अंदाजे सांगितलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, ट्रॅक्टरमध्ये वाळु भरलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विरुध्द खोटा गुन्हा दाखल केला. हे म्हणणे

खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-
(ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा.

दिनांक- ०९/१२/२०२५.